


# नयनताराने केलं टक्कल ?

साऊथ सुपरस्टार यशच्या बहुप्रतिक्षित 'टॉक्सिक : अ फेयरी टेल फॉर ग्रोन-अप्स' या सिनेमाची सध्या जोरदार चर्चा सुरू आहे. एकीकडे सिनेमाच्या रिलीजची तारीख जवळ येत असताना यशच्या चाहत्यांमध्ये उत्सुकता शिगेला पोहोचली आहे, तर दुसरीकडे सिनेमातील अभिनेत्री नयनतारा एका वेगळ्याच कारणामुळे सोशल मीडियावर चर्चेत आली. नयनताराने 'टॉक्सिक' सिनेमासाठी चक्क टक्कल केल्याचे काही फोटो सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाले आहेत. मात्र, या व्हायरल फोटोंमागचं खरं सत्य आता समोर आलं असून, नयनताराने टक्कल केल्याचा दावा पूर्णपणे खोटा असल्याचे फॅक्ट-चेकमधून समोर आले आहे. सोशल मीडियावर नयनताराचे काही फोटो मोठ्या प्रमाणात शेअर केले जात होते. या फोटोंमध्ये ती पांढऱ्या रंगाच्या ड्रेसमध्ये आणि हिरव्या ओढणीमध्ये दिसत होती. मात्र, तिच्या डोक्यावर केस नसल्याचं दिसत असल्याने तिने तिरुमला मंदिरात जाऊन टक्कल केल्याचा दावा करण्यात आला. इतकंच नाही तर 'टॉक्सिक' सिनेमाच्या यशासाठी नयनताराने हा नवस केल्याची चर्चा देखील सोशल मीडियावर रंगली. 'टॉक्सिक'मध्ये नयनतारा महत्त्वाची भूमिका साकारत असल्याने या दाव्याला आणखी हवा मिळाली. काही चाहत्यांनी तर अभिनेत्रीने सिनेमातील भूमिकेसाठी आपला लूक बदलल्याचा अंदाजही व्यक्त केला.



# गोविंदाबरोबरील वादावर पडदा..!

गेल्या अनेक महिन्यांपासून बॉलिवूडचा अभिनेता गोविंदा आणि त्याची पत्नी सुनिता आहुजा यांच्या वैवाहिक आयुष्यात खळबळ उडाली होती. मात्र, आता या संपूर्ण वादावर पडदा पडला आहे. सुनिता आहुजा यांनी गोविंदाविरोधात दाखल केलेली घटस्फोटाची याचिका अखेर मागे घेतली असून, गोविंदाचे मॅनेजर शशी सिन्हा यांनी या वृत्ताला अधिकृत दुजोरा दिला आहे. काही दिवसांपूर्वी सुनिता या वांद्रे येथील कौटुंबिक न्यायालयात (फॅमिली कोर्ट) दिसल्या होत्या, तेव्हापासूनच विविध चर्चांना उधाण आले होते. आता त्या याचिका मागे घेण्यासाठीच न्यायालयात गेल्याचे स्पष्ट झाले आहे. 'हिंदुस्तान टाईम्स'शी बोलताना गोविंदाचे मॅनेजर शशी सिन्हा यांनी सांगितले की, "सगळे इतके का घाबरत आहेत? सुनिताजींनी आपली केस मागे घेतली आहे, ही तर अत्यंत आनंदाची आणि सुखाची गोष्ट आहे. कोर्टात जाताना त्या खूप रागात दिसत असल्यामुळे सर्वांना काहीतरी मोठी अडचण वाटली असावी; पण आता दोघांमधील सर्व वाद मिटले असून परिस्थिती पूर्ववत झाली आहे." शशी सिन्हा यांनी कौटुंबिक वाद चव्हाट्यावर आल्याबद्दल खंतही व्यक्त केली. "घरातील भांडणे घरातच सुटायला हवीत. बसून चर्चा केली की अनेक प्रश्न सुटतात. जर आज केस मागेच घ्यायची होती, तर ती आधी का दाखल केली? आज संपूर्ण जगासमोर आमचा तमाशा झाला, याचे नक्कीच वाईट वाटते," असे ते म्हणाले. गेल्या काही काळापासून सुनिता यांनी गोविंदावर अनेक गंभीर आणि वादग्रस्त आरोप केले होते.

# 'आवारापन २'ने मोडला मोठा रेकॉर्ड

बॉलिवूड अभिनेता इमरान हाश्मी सध्या त्याच्या 'आवारापन २' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. १४ ऑगस्ट रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाने अवघ्या चार दिवसांत इमरानच्या कारकिर्दीतील मोठा विक्रम आपल्या नावावर केला आहे. विशेष म्हणजे, इमरानने गेल्या २३ वर्षांत केलेल्या अनेक चित्रपटांना 'आवारापन २'ने कमाईच्या बाबतीत मागे टाकलं आहे. इमरान हाश्मीने आपल्या कारकिर्दीत 'मर्डर', 'गँगस्टर', 'राज', 'आवारापन' यांसारख्या अनेक चित्रपटांमध्ये काम केलं आहे. गेल्या अनेक वर्षांपासून तो बॉलिवूडमध्ये सक्रिय आहे. मात्र, त्याच्या कोणत्याही सोलो चित्रपटाने भारतातील बॉक्स ऑफिसवर 'आवारापन २'इतकी कमाई केली नव्हती. नितीन कक्कर यांच्या दिग्दर्शनाखाली तयार झालेला 'आवारापन २' १४ ऑगस्टला प्रदर्शित झाला. रिपोर्टनुसार, चित्रपटाने प्रदर्शनानंतर अवघ्या चार दिवसांत भारतात तब्बल ९१ कोटी रुपयांची कमाई केली आहे. इमरानने आतापर्यंत ४० हून अधिक चित्रपटांमध्ये काम केलं आहे. मात्र, त्याच्या कोणत्याही सोलो चित्रपटाने भारतात लाइफटाइम ९१ कोटी रुपयांची कमाई केलेली नव्हती. त्यामुळे 'आवारापन २'ने अवघ्या चार दिवसांत इमरानच्या आधीच्या ४० हून अधिक चित्रपटांना कमाईच्या बाबतीत मागे टाकल्याचं सांगितलं जात आहे. या दमदार कमाईमुळे 'आवारापन २' हा इमरान हाश्मीच्या कारकिर्दीतील आतापर्यंतचा सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट ठरला आहे. 'आवारापन २'च्या आधी इमरानच्या कारकिर्दीतील सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट 'द डर्टी पिक्चर' होता. २०११ मध्ये प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाने भारतात जवळपास ८० कोटी रुपयांची कमाई केली होती. मात्र, 'आवारापन २'ने केवळ चार दिवसांत ९१ कोटी रुपयांचा टप्पा गाठत 'द डर्टी पिक्चर'लाही मागे टाकलं आहे. त्यामुळे इमरानच्या चाहत्यांसाठी हा विक्रम विशेष महत्त्वाचा ठरला आहे. इमरान हाश्मीच्या सर्वाधिक कमाई करणाऱ्या चित्रपटांची चर्चा करताना 'टायगर ३'चा उल्लेख होऊ शकतो.

